Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education,
Kolhapur Divisional Board,
539, Rajendranagar,
Kolhapur - 416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
539, राजेंद्रनगर, कोल्हापूर -
416004

Ph. No. (0231) 2696101/ 2 / 3 Website - www.sscboardkolhapur.in Email - divsec.kop@gmail.com

क्र. कोविमं/लेखा/दुष्काळग्रस्त फी माफी /2026-27/3491

दिनांक : 30 / 09 / 2026

01 OCT 2026

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
मान्यताप्राप्त सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर जिल्हा

**विषय** : दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणेबाबत.

**संदर्भ** : 1) राज्य मंडळाचे क्र.रा.मं./परीक्षा-3/3454, दिनांक 13.08.2026 रोजीचे पत्र.
2) राज्य मंडळाचे क्र.रा.मं./परीक्षा-3/3507, दिनांक 18.08.2026 रोजीचे पत्र.
3) मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय यांचा शासन निर्णय क्र. समिती 2026/प्र.क्र./ 82 / मदत-2, दिनांक 25 सप्टेंबर, 2026
4) राज्य मंडळाचे क्र.रा.मं./लेखा/दुष्काळग्रस्त फी माफी/26-27/4044, दि.29.09.2026 रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 1 व 2 अन्वये फेब्रुवारी-मार्च 2027 मधील महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत (इ.10 वी) व उच्च माध्यमिक (इ.12 वी) प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ट होवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरून घेण्याबाबत सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

तथापि शासन निर्णय दिनांक 25 सप्टेंबर, 2026 अन्वये महाराष्ट्र राज्यातील 265 तालुक्यांमध्ये दुष्काळग्रस्त परिस्थिती निर्माण झाल्यामुळे राज्य शासनाने 265 तालुक्यांमध्ये विशेष बाब म्हणून उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामध्ये शालेय / महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी देण्याबाबत नमूद केलेले आहे.

तरी उपरोक्त शासन निर्णयानुसार फेब्रुवारी-मार्च 2027 मध्ये आयोजित इ.10 वी व इ.12 वी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्हयातील खालील दुष्काळग्रस्त तालुक्यातील विद्यार्थ्यांकडून पुढील आदेश येईपर्यत परीक्षा शुल्क न घेता आवेदनपत्रे भरून घेण्याची कार्यवाही करण्यात यावी. याबाबत राज्य मंडळ कार्यालयाकडून पुढील सूचना प्राप्त झाल्यानंतर यथाशीघ्र निर्गमित करण्यात येतील.

**कोल्हापूर विभागीय मंडळातील खरीप हंगाम 2026 - प्रथम कळ (Trigger-1) लागू झालेल्या तालुक्यांची माहिती**

| महसूल विभाग | अ.क्र. | जिल्हा | प्रथम कळ (Trigger-1) लागू झालेले तालुके | |
|---|---|---|---|---|
| | | | तालुक्यांची नांव | तालुक्यांची संख्या |
| पुणे | 1 | सांगली | मिरज, आटपाडी, जत, कवठेमहांकाळ | 04 |
| | 2 | सातारा | सातारा, खटाव, माण, फलटण, खंडाळा, महाबळेश्वर | 06 |
| | 3 | कोल्हापूर | पन्हाळा, राधानगरी, गगनबावडा, भुदरगड, आजरा, चंदगड | 06 |

(गजानन तानाजी उकिर्डे)
**विभागीय सचिव,**
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**प्रत माहितीस्तव :**
मा. सचिव, राज्य मंडळ, पुणे.

**प्रत माहितीस्तव तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :**
1. मा. विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
2. शिक्षणाधिकारी (माध्य), सातारा / सांगली / कोल्हापूर
यांना कळविण्यात येते की, दुष्काळग्रस्त तालुक्यातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क न घेता आवेदनपत्रे भरून घेण्याबाबत माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना आपल्या स्तरावरून सूचित करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

D/Ansar/Dushkal 2025/Letter